MHJN020021832018

भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.१८९/२०१८
शामराव काळे व इतर वि. शासन व इतर
CNRMHJN020021832018

## निशाणी क्रमांक १९ वरील आदेश

सदरचा अर्ज मयत अर्जदार क्र.४ च्या वारसांतर्फे महत्वाची कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मिळणेकामी दिला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे आहे –

मयत अर्जदार क्र.४ च्या वारसांतर्फे मयत अर्जदाराचे मृत्यू प्रमाणपत्र, वारस दाखला इत्यादी महत्वाची कागदपत्रे सादर केली आहेत. सदरची कागदपत्रे दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी मयत अर्जदार क्र.४ च्या वारसांनी सदर कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) सामनेवाला क्र.१ तर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. अर्जातील सर्व विरोधी कथने सामनेवाला क्र.१ ने नाकारली आहे. उशीराने कागदपत्रे सादर केली आहेत. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४) मयत अर्जदार क्र.४ चे वारस व सामनेवाला क्र.१ तर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) मयत अर्जदार क्र.४ च्या वारसांतर्फे सदरच्या भूसंपादन निर्देशन अर्जात मुळ अर्जदार क्र.४ मयत झाल्यानंतर त्याचे वारस अभिलेखावर घेणेकामी महत्वाची कागदपत्रे सादर केली आहेत. त्यानुसार मुळ अर्जदार क्र.४ चे मृत्यू प्रमाणपत्र, वारस दाखला इत्यादी कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मयत अर्जदार क्र.४ तर्फे वारसांनी मागितली आहे. सदर कागदपत्रे दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सामनेवालांतर्फे उशीराने कागदपत्रे सादर केली असल्याचे नमूद केले आहे.

६) मयत अर्जदार क्र.४ चे वारसांतर्फे सादर केलेल्या कागदपत्रांचे स्वरुप विचारात घेता मुळ अर्जदार क्र.४ चे मृत्यू प्रमाणपत्र व वारस दाखल्याची मुळ प्रत दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. या करिता सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज निशाणी क्र.१९ खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे.

२) मयत अर्जदार क्र.४ चे वारसांनी वर्णन यादी निशाणी क्र.२० सोबत सादर केलेले कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/–
(एन. एल. येवलेकर)
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
जालना

दिनांकः १९/१२/२०२३

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय व.स्तर, जालना

दिनांक : १९/१२/२०२३

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड-३)